# Dr. S. R. Kattimani

**(M.A., B.Ed, NET, Ph.D (History), B.J.M.S., M.B.A, M.A.(English)**

Dept. of History

**VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)**


# इतिहासाच्या 51 व्याख्या

# 1.हिरोडोटस

- इतिहास म्हणजे भूतकालीन मनोवेधक आणि संस्मरणीय घटनांचा मागोवा घेणे होय.

- भूतकालीन मनोरंजक व संस्मरणीय घटनांचा आढावा म्हणजे इतिहास होय.

# 2. थ्यूसिडायडीज

अनुभवाच्या साह्याने तत्वज्ञानाचा मागोवा घेणे म्हणजे इतिहास होय.

# 3. प्रोफेसर नेव्हिस

इतिहास म्हणजे भूतकाळ व वर्तमान काळ यांना जोडणारा पूल होय.

# 4. जे. बर्कहार्ट

- एका युगाला दुसऱ्या एका युगाच्या बाबतीत दखल घेण्या
  जोग्या ज्या गोष्टी घडतात त्यांची नोंद म्हणजे इतिहास होय.
- इतिहास म्हणजे जाणीवेच्या जागृतीमुळे निसर्गाशी घडून
  आलेली फारकत होय.
- अनेक युगामध्ये ज्यांचे अस्तित्व पुसले गेले नाही अशा
  घटनांचा वृत्तान्त म्हणजे इतिहास होय.

# 5. किटिंग व बलाच

इतिहास म्हणजे मानवी कृतीची नोंद होय.

# 6.पंडित जवाहरलाल नेहरू

मानवाची रानटी अवस्थेकडून सुसंस्कृत अवस्थेकडे होणारी वाटचाल विशद करणारे शास्त्र म्हणजे इतिहास होय.

# 7.प्रो.जॉन लिकी

नैतिक कल्पनांचा संग्रह व स्पष्टीकरण म्हणजे इतिहास होय.

# ४.हॅप्पोल

इतिहास हा अनुभवाचा अखंड दीप आहे.

# ९.प्रो.जे.बी.ब्युरी

इतिहास हे दुसरे काही नसून ते एक शास्त्र आहे.

## 10.ब्रेनहॅम

इतिहास हा मानसशास्त्रीय व भौतिकशास्त्रीय कारण परंपरांचा शोध घेऊन स्थळ व काळ यांच्यामध्ये घटना सिद्‍ध करतो.

# 11.हर्डर

इतिहास म्हणजे घटनांची मालिका होय.

# <u>12.फ्रांसिस बेकन</u>

मानवाला शहाणा बनवणारी विद्याशाखा म्हणजे इतिहास होय

# 13.रुसो

अनेक असत्य बाबींमधून सत्याजवळ जाणारी घटना शोधून देणारा विषय म्हणजे इतिहास होय.

# 14.हेन्री जोन्स

जे सर्व काही घडले ते म्हणजे इतिहास

# 15.प्रो.एफ.डब्ल्यू.मेटलॅन्ड

इतिहास म्हणजे मानवाने काय केले किंवा सांगितले यापेक्षा त्याने जो विचार मांडला त्यालाच इतिहास म्हणायचे.

# 16.जी.जे.रेनियर

इतिहास म्हणजे समाजामध्ये राहणाऱ्या लोकांची हकीकत होय.

# 17. एडमंड बर्क

दूरदर्शीपणाचा मार्गदर्शक म्हणजे इतिहास होय.

# 18.थॉमस कार्लाईल

इतिहास म्हणजे श्रेष्ठ व्यक्तींची चरित्रे व त्यांनी केलेली

कामगिरी होय.

# 19.जॉन सिली

गतकाळातील राजकारण व वर्तमान काळातील राजकारण म्हणजे भावी इतिहास होय.

# 20.लॉर्ड ॲक्टन

इतिहास म्हणजे मानवी स्वातंत्र्याची कथा होय

# 21.प्रो.ए.एल.राऊस

विशिष्ट अशा भौगोलिक व प्राकृतिक परिस्थितीमध्ये समाज करून राहणाऱ्या मानवी जीवनाची कथा म्हणजे इतिहास होय.

# 22.गोविंद सखाराम सरदेसाई

इतिहास म्हणजे मानवी प्रगतीचा आढावा होय.

# 23.ई.एच.कार

इतिहास म्हणजे वर्तमानकाळ व भूतकाळ यामधील कधीही न संपणारा संवाद होय

# 24.प्रो.अर्नाल्ड जोसेफ टायन्बी

मानवी संस्कृतीचा उदय व अस्त म्हणजे इतिहास होय.

# 25.एन्सायक्लोपीडिया ऑफ ब्रिटानिका

इतिहास म्हणजे घटनांची जंत्री किंवा बाड (घटना) होय.

# 26.एडवर्ड गिबन

इतिहास म्हणजे मानवी गुन्हे, मानवी चुका व मानवी दुर्दैव होय.

# 27.प्रोफेसर जी.आर.एल्टन

मानवाने आपली जी भावना व्यक्त केली, विचार व्यक्त
केला किंवा जे कार्य केले अथवा त्याने जे आघात सहन
केले ते सर्व म्हणजे इतिहास होय.

# 28.प्रो.रॉबिन जॉर्ज कॉलींगवुड

- ❖ इतिहास म्हणजे भूतकाळाचे संशोधन किंवा चौकशी करणे होय.
- ❖ सर्व इतिहास हा विचारांचा असतो

# 29.इमॅन्युएल कान्ट

- मानवी विवेक शक्तीला आव्हान करणारी शक्ती म्हणजे इतिहास.
- निसर्गाने पूर्वी ठरवलेली योजना कार्यान्वित करणारी प्रक्रिया म्हणजे इतिहास.

# 30.कार्ल मार्क्स

- इतिहास म्हणजे वर्गसंघर्ष होय.

- आहे रे आणि नाही रे या दोन वर्गातील वर्ग संघर्ष म्हणजे इतिहास होय.

# 31.डी.वॉल्टेअर

मृत व्यक्ती वर जिवंत व्यक्तीने केलेली किमिया म्हणजे इतिहास होय.

# 32.गॅम्बाटिस्टो विको

मानवाची सामाजिक प्रगती म्हणजे इतिहास होय.

# 33.बेनेटो क्रोसे

इतिहास म्हणजे सर्व इतिहास समकालीन असतो

# 34.डॉ.आर.सी.मजुमदार

पुराण , इतिवृत्त, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र म्हणजे इतिहास होय.

# 35.कल्हण

इतिहास म्हणजे राजनीती होय.

# 36.हेन्री  जॉन्सन

ज्या घटनांचा मानवी मनावर खोल ठसा उमटतो त्याला इतिहास म्हणतात.

# 37.डी.कान्डरसेट

इतिहास म्हणजे मानवाची बौद्धिक व कलात्मक प्रगती

नसून जागतिक मताधिकार शिक्षण, भाषण व विचार

स्वातंत्र्य घटनात्मक ऐक्य व संपत्तीचे समान विभाजन

करणारा विषय होय.

# 38.ॲरिस्टॉटल

- इतिहास हा न बदलणाऱ्या भूतकाळाची कथा आहे.
- इतिहास ही कधीही न बदलणारी घटनांची मालिका होय.

# 39.चार्ल्स फार्थ

इतिहास ही केवळ स्वत: च्या फायद्यासाठी अभ्यास करण्याची ज्ञानाची शाखा नाही तर मनुष्यांच्या रोजच्या जीवनात उपयोगी पडणारे एक प्रकारचे ज्ञान आहे.

# 40.हेन्री पायरेन

इतिहास ही समाजातील मानवांच्या कृतीआणि कर्तृत्वाची कहाणी आहे.

# 41.विल ड्युरंट

सुसंस्कृत मानवांनी भूतकाळात काय विचार केला त्याचे वर्णन म्हणजे इतिहास आहे.

# 42.ऑगस्त  कॉम्त

जगात सर्वधर्म समभाव असावा व मानवजातीची प्रगती

ही तीन टप्प्यांमधून होत असते ते म्हणजे धर्मशास्त्र,

तत्त्वज्ञान आणि विज्ञान   यालाच त्यांनी इतिहास असे

म्हटले आहे .

# 43.हेन्री स्टील कामेंजर

भूतकाळ आणि भूतकाळ मध्ये घडलेल्या घटना म्हणजे

इतिहास नव्हे तर दप्तरातील नोंदीचा जेव्हा अर्थ जेव्हा लावला जातो, तेव्हा जे विवेचन तयार होते, त्याला इतिहास असे म्हणतात.

# 44. प्रो. सिड्नबॉस

इतिहासाचे ज्ञान हे अप्रत्यक्ष स्वरूपाचे असते म्हणून ते
तर्काधिष्ठित असते.

# 45.प्रो.फिंडले

मानवांने जे कार्य केले किंवा त्याच्या संबंधी त्याने विचार
व्यक्त केले, त्या सर्वांपेक्षा त्याने एकंदर परिस्थितीसंबंधी
जो विचार व्यक्त केला त्याला इतिहास असे म्हणतात.

# 46.इतिहासाचार्य वि.का.राजवाडे

- इतिहास म्हणजे असे असे घडले होय .
- जे जे घडले ते सर्व सांगणे म्हणजे इतिहास होय.

# 47.फ्रेडरिक  हेगेल

मानवी समाज एका विशिष्ट ध्येयाप्रत जात असताना चढत्या क्रमाने प्रगती होते , यालाच इतिहास प्रक्रिया असे म्हणतात.

# 48.प्रो.डब्ल्यू.एच.वॉल्श

विद्वानांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर मानवी ज्ञानात भर टाकण्याचा केलेला एक प्रयत्न म्हणजे इतिहास होय.

# 49.ओसवाल्ड स्पेंग्लर

इतिहास म्हणजे निव्वळ धर्मशास्त्र, प्रत्यक्षवाद , उदय - परिपक्वता व र्हास अशी प्रक्रिया आहे.

# 50.प्रो.बी.शेख अली

इतिहास म्हणजे घटनांची नोंद ठेवणारी तत्त्वज्ञानाची एक शाखा होय.

# 51.डायोनिसस

इतिहास म्हणजे असा विषय की ज्यामधून उदाहरणाद्वारे समाजाला काही तत्वज्ञान समजते.